वाचा:- १) महा.शासन सामान्य प्रशासन विभाग, शा.नि. क्र एसआरव्ही/१०८८/प्र.क्र.११/८८/१२ दि. २१/२/९४
२) महा.शासन सामान्य प्रशासन विभाग, शा.नि. क्र एसआरव्ही/१०९५/प्र.क्र.१/९५/१२ दि. ८/६/९५
३) महा.शासन वित्त विभाग, शा.नि. क्र. वेतन-११९९/प्र.क्र.२/९९सेवा-३ दि.२०/०७/२००१
४) महा. शासन वित्त विभाग, शा.नि. क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३ दि.०१/०४/२०१०
५) महा. शासन वित्त विभाग, शा.नि. क्र. वेतन-१११/प्र.क्र.८/सेवा-३ दि.०१/०७/२०११
६) महा. शासन वित्त विभाग, शा.नि. क्र. वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३ दि.२/३/२०१९
७) पदोन्नती समिती सभा इतिवृत्त दि- १८/०९/२०१९
८) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक १८/९/२०१९

नाशिक जिल्हा परिषद नाशिक
वित्त विभाग,
जा.क्र. जपना/अर्थ/आस्था-१/ ८२२/२०१९
नाशिक दिनाक:- १८/०९/२०१९

**आदेश :-**

वर्ग ३ व वर्ग ४ मधील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालवणेसाठी महाराष्ट्र, शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/१२ दिनांक ८/०६/१९९५, महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन-१०९९/ प्र.क्र.२/९९/सेवा-३ दिनांक २०/७/२००१ तसेच महा. शासन वित्त विभाग,निर्णय क्र.वेतन-१११९/ प्र.क्र.३/सेवा-३ दि. ०२ मार्च २०१९ अन्वये जाहीर केलेल्या सुधारीत आश्वासित प्रगती योजनेच्या अटी/शर्तीस अधीन राहुन खालील कर्मचारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासुन पदोन्नतीच्या साखळीतील **कनिष्ठ लेखाधिकारी जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लेखा) व्दितीय श्रेणी** या पदाची सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० व सातव्या वेतन आयोगा नुसार सुधारीत वेतन संरचना वेतन मॅक्ट्रीक्स एस १३ रू. ३५,४००-१,१२,४००/- ही वरिष्ठ वेतनश्रेणी खालील अटी व शर्तीच्या अधीन मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्रं | कर्मचा-याचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | वरिष्ठ सहाय्यक पदावर हजर दिनांक | महाराष्ट्र लेखा लिपिक परिक्षा उत्तीर्ण/ सुट | उप लेखापाल परिक्षा उत्तीर्ण /सुट दिनांक | वरिष्ठ सहाय्यक पदावर १० वर्ष पुर्ण झाल्याचा दि. | पहिली आश्वासीत प्रगती योजना लागू करण्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ०१ | श्री. जयंत शिवदास चौधरी (६ व्या वेतन आयोगानुसार) | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प. नाशिक | २०.३.१९९९ | नोव्हे.२००३ | ऑक्टोबर २००६ | २०.३.२०११ | २०.३.२०११ (१२ वर्ष) ( शा. नि. १.४.१० नुसार) | पहिला लाभ |
| ०२ | श्री. मिलींद पांडुरंग वहाळकर | कार्यकारी अभियंता इवद क्र.१ | २५.०२.०४ | नोव्हें. २००२ | सुट दि.११/३/०६ | २५.०२.१४ | ०१.०१.२०१६ (प्रत्यक्ष लाभ मराठी टंकलेखन उत्तीर्ण झालेपासून) | पहिला लाभ |
| ०३ | श्रीमती. मंदाकिनी विलास पवार | वित्त विभाग जि.प.नाशिक | ०४.०३.०४ | नोव्हें २००० | नोव्हे २००४ | ०४.०३.१४ | ०१.०१.२०१६ | पहिला लाभ |
| ०४ | श्री. राजेंद्र वाळनाथ हरिश्चंद्र | गटविकास अधिकारी प.स.इगतपुरी | ३१.०५.०४ | नोव्हें २००७ | नोव्हें २००८ | ३१.०५.१४ | ०१.०१.२०१६ | पहिला लाभ |
| ०५ | श्री. मंगेश सावळीराम जगताप | वित्त विभाग जिल्हा परिषद नाशिक | ११.१०.०५ | नोव्हे २००५ | ऑक्टोबर २००६ | ११.१०.१५ | ०१.०१.२०१६ | पहिला लाभ |

Scanned by CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | श्री. शैलेश दत्तात्रय कांगणे | गटविकास अधिकारी पं.स.कळवण | १३.०९.०५ | मार्च २००८ | नोव्हें २००८ | १३.०९.१५ | ०१.०१.२०१६ | पहिला लाभ |
| ०७ | श्री. विनय शिवाजी सोनवणे | एकात्मीक बालविकास सेवा योजना चांदवड | २८.१०.०५ | नोव्हें २०१० । | फेब्रुवारी २०१६ | २८.१०.१५ | १५.०२.२०१६ (उपलेखापाल परिक्षा उत्तीर्ण झाले पासुन) | पहिला लाभ |
| ०८ | श्री. कुणाल किशोरसिंग चंदेल | एकात्मीक बालविकास सेवा योजना मालेगांव | २९.१०.०५ | नोव्हें २०१० | डिसेंबर २०१३ | २९.१०.१५ | ०१.०१.२०१६ | पहिला लाभ |
| ०९ | श्री. जगन्नाथ नानु गवळी | एकात्मीक बालविकास सेवा योजना पेठ | १०.१०.०५ | उत्तीर्ण २००८ | सुट दि. १०.०६.२०१४ | १०.१०.१५ | ०१.०१.२०१६ (दुसरा लाभ) | पहिला लाभ दि.१६/८/०५ पासुन |
| १० | श्रीमती. वर्षा चुडामन पाटील | एकात्मीक बालविकास सेवा योजना बागलाण | ०६.०६.०६ | जाने २०१४ । | सुट दि. ३/१/२०१६ | ०६.०६.१६ | ०६.०६.२०१६ | पहिला लाभ |
| ११ | श्री. नितीन माधवराव खैरणार | पंचायत समिती नाशिक | २५.०२.०४ | नोव्हें २००० | नोव्हें २००४ | २५.०२.१४ | ०१.०१.२०१६ | पहिला लाभ |
| १२ | श्री. दिलीप शालन तडवी | एकात्मीक बालविकास सेवा योजना मालेगांव | १८.०१.०६ | नोव्हें २००९ | नोव्हें २००८ | १८.०१.१६ | १८.०१.२०१६ | पहिला लाभ |
| १३ | श्री. उमेश धरमसिंह राजपुत | महिला व बाल विकास जि.प | २६.११.०८ | नोव्हें २०११ | डिसेंबर २०१२ | २६.११.१८ | २६.११.२०१८ | पहिला लाभ |
| १४ | श्री. सुभाष चंद्रभान गायकवाड | पंचायत समिती येवला | २१.११.०८ | सुट दि. ३१/५/११ । | सुट दि. ३१/५/११ | २१.११.०८ | २१.११.०८ | पहिला लाभ |
| १५ | श्रीमती. धनश्री महेश पवार | वित्त विभाग | ०१.१२.०८ | नोव्हें २०११ | डिसेंबर २०१२ | ०१.१२.१८ | ०१.१२.२०१८ | पहिला लाभ |
| १६ | श्रीमती. स्मिता सुभाष देवरे | इवद क्रं.१ जि.प | २१.११.०८ | नोव्हें २०११ | डिसेंबर २०१२ | २१.११.१८ | २१.११.२०१८ | पहिला लाभ |
| १७ | श्री. किरण रंगनाथ दराडे | लपा पुर्व जि.प | १७.०२.०९ | मार्च २०१५ | डिसेंबर २०१३ | १७.०२.१९ | १७.०२.२०१९ | पहिला लाभ |
| १८ | श्री. दत्तात्रेय विठ्ठल वावधाने | लपा पश्चिम जि.प | २२.०६.०९ | सुट दि. ३१/०३/१० । | सुट दि. ३१/०३/१० | २२.०६.१९ | २२.०६.२०१९ | पहिला लाभ |
| १९ | श्री. दिनकर खंडेराव सांगळे | वित्त विभाग | ०३.०१.०४ | नोव्हे. २००७ | नोव्हे. २००८ | ०३.०१.१४ | १/१/२०१६ (यापुर्वी प्रथम लाभ मंजुर दिनांकास सुधारणा) | पहिला लाभ |
| २० | श्री. मिलिंद अनंतराव मांळी | वित्त विभाग | १/४/२०१५ (प.ला.मंजुर दि.३/४/०९) | जुन २००९ | ऑगष्ट २०१६ | ३/४/२०१७ | ३/४/२०१७ | दुसरा लाभ |

Scanned by CamScanner

सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत योजना लागू करण्याबाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.

१. या योजनेचा लाभ संबधित पदावरील १०/२०/३० वर्षाच्या नियमित सेवेनंतरच अनुज्ञेय होईल.

२. वरिष्ठ वेतनश्रेणीमुळे जबाबदारी आणि कर्तव्यात वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नती प्रमाणे वेतन निश्चिती प्रमाणे लाभ देण्यात येईल. मात्र वेतननिश्चितीचा मिळालेला लाभ त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक (Functional) पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही.

३. सेवेत तीन किंवा त्याहुन अधिक वेळा पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही. तसेच जर कर्मचा-यांस विशेष वेतन मिळत असेल तर या योजनेखालील पदोन्नती नंतर मुळ वेतनश्रेणीतील विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

४. उपरोक्त पदोन्नतीच्या पदाची वेतननिश्चितीसाठी शा.नि.दि.६/११/१९८४ नुसार संबंधीताने एक महिन्याचे आत विकल्प देणे आवश्यक राहील. मुदतीत विकल्प न दिल्यास नियमानुसार वेतन निश्चिती करण्यात येईल.

५. या योजनेंतर्गत पदोन्नती मिळाली तरी कर्मचा-यांचे नाव मुळ संवर्गाच्या जेष्ठता सुचीत राहील. आणि सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार उपलब्ध रिक्ततेत योग्य वेळी नियमित पदोन्नतीसाठी (Functional Promotion) त्याचा विचार पात्रता व जेष्ठता यानुसार करण्यात येईल.

६. ज्या कर्मचा-यांचे विरुध्द त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेस अगर त्यानंतर खातेचौकशी चालु असेल अगर प्रलंबित असेल अशा कर्मचा-यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

७. या योजने अंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय ठरविली असल्याने वरिष्ठ वेतन श्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीच्या पदाकरिता विहित केलेली अर्हता, पात्रता, जेष्ठता, अर्हता परिक्षा, विभागीय परिक्षा या सर्व बाबींची पुर्तता करणे तसेच पदोन्नतीची कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक राहील.

८. ज्या कर्मचा-यांनी अद्याप पावेतो जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही त्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही. याबाबतीत कार्यालय प्रमुखांनी मुळ सेवापुस्तकावरुन खात्री करुन घ्यावी.

९. सुधारीत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत मंजुर लाभासाठी परिगणना करतांना सेवा कालावधीत अनर्हता सेवेचा कालावधी नसले बाबतीत कार्यालय प्रमुख यांनी मुळ सेवापुस्तकावरुन खात्री करावी. तद्नंतर लाभ अनुज्ञेय करावा.

१०. नियमित पदोन्नती नाकारलेल्या तसेच नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ देय होणार नाही.

११. शासन निर्णय दि. २२.११.२००० नुसार कालबध्द पदोन्नती अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यामुळे कर्मचा-यांस संवर्गात/पदात बदल होत नसल्याने कर्मचारी वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन घेत असेल व त्या कालावधीत त्यांना आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजुर करण्यात आल्यास अशा प्रकरणी आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी तो वेतन घेत असलेल्या वरिष्ठ वेतनश्रेणीत मंजुर करण्यात यावा.

१२. संबधित कर्मचारी प्रत्यक्ष पदोन्नतीस अपात्र ठरला अथवा त्यांनी पदोन्नती नाकारली तर कर्मचा-याला देण्यात आलेले लाभ काढुन घेण्यात येतील. यासंदर्भात संबधितांकडून बंधपत्र घेवून त्याची प्रत सेवापुस्तकात चिकटवावी व एक प्रत या कार्यालयाकडे सादर करावी.

१३. या योजनेखाली पात्र कर्मचा-यांना त्यांच्या संपुर्ण सेवाकालावधीत कमाल तीन वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना मंजुर करण्यात येईल. तथापि तीन किंवा त्यापेक्षा जास्त पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणार नाही. या संदर्भात संबधित कार्यालय प्रमुखांनी कर्मचा-यांचे सेवापुस्तकावरून पडताळणी करून लाभ अनुज्ञेय करावा. शासन स्तरावरून वेळोवेळी प्राप्त होणारे आदेश, न्यायालयीन प्रकरणे, लेखापरिक्षण इ. मुळे लाभ देय नसल्याचे /अतिप्रदान असल्याचे निष्पन्न झाल्यास अतिप्रदानाची रक्कम कर्मचारी यांचेकडून वसुल करणेत येईल.

१४. सदर आदेशान्वये मंजुर करण्यात आलेली सुधारित आश्वासित प्रगती योजने संबंधी कोणी आक्षेप घेतल्यास व यात प्राथमिक चौकशी अंती तथ्य दिसुन आल्यास अगर सादर केलेली माहिती चुकीची / खोटी आढळुन असल्याचे निदर्शनास आल्यास दिलेल्या लाभ कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

वरील प्रमाणे खालील कर्मचारी सर्व अर्हता पुर्ण करत असल्याने व त्यांचे मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची सरासरी ही चांगला (ब) अथवा उच्च सरासरी येत असल्याने त्यांना सलग १२ वर्ष व १० /२० /३० वर्ष ज्या तारखेस पुर्ण होत आहे किंवा त्यांना पदोन्नतीसाठीची अर्हता असलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण किंवा सुट मिळाल्याचे दिनांकापासून आश्वासीत प्रगती योजना पदोन्नती साखळीतील **कनिष्ठ लेखाधिकारी गट-क या पदाची सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० व सातव्या वेतन आयोगा नुसार वेतन मॅक्ट्रीक्स एस १३ रू. ३५,४००-१,१२,४००/- लागू करणेसाठी समितीने एकमताने शिफारस केली** आहे. अशी कार्यवाही पुर्ण करून समितीचे कामकाज संपल्याचे मा. अध्यक्ष यांनी जाहिर केले आहे.

Scanned by CamScanner

वरील कर्मचा-यांचे मुळ सेवापुस्तकावरुन त्यांची सेवेत हजर झालेची तारीख / अर्हता परिक्षा उत्तीर्ण झालेची इ. बाबींची पडताळणी करुन संबधीत कर्मचा-यासं सदर योजनेचा लाभ देण्यात यावा, व सदर आदेशाची नोंद संबधीत कर्मचा-यांचे मुळ सेवापुस्तकांत घेणेत यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रति.

श्री / श्रीमती ---------------------------------------- (सर्व संबंधित)
व्दारा:- ----------------------------------------------------
खाते प्रमुख / गटविकास अधिकारी पंचायत समिती ------------
( सर्व संबंधीत कार्यालय प्रमुख यांचे व्दारे )

प्रत :-

१) खाते प्रमुख (सर्व) जिल्हा परिषद, नाशिक
२) गट विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती ----------- (सर्व)
३) बाल विकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो. प्रकल्प कार्यालय ------------ (संबंधित सर्व)
४) कार्यालयीन प्रत / ज्ञापन नस्ती

Scanned by CamScanner